पुढारी

# राज्यपाल सी. विद्यासागर राव आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**




राज्यपाल सी. विद्यासागर राव शुक्रवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचे सकाळी दहा वाजता पत्नी सौ. विनोधा यांच्यासमवेत कोल्हापूर विमानतळावर आगमन होईल. यानंतर सकाळी सव्वा दहा वाजता ते करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मंदिरात दर्शन घेणार आहेत. यानंतर ते रंकाळा तलावालाही भेट देणार आहेत.

दुपारी दीड वाजता शिवाजी विद्यापीठात पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्राच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर दुपारी एक वाजून पन्नास मिनिटे ते तीन वाजेपर्यंत ते शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. दुपारी पावणे चार वाजता ते कोल्हापूर विमानतळावरून हेलिकॉप्टरने मुंबईला रवाना होणार आहेत.

लोकमत

# राज्यपाल आज जिल्हा दौऱ्यावर

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव हे आज, शुक्रवारी जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांच्या उपस्थितीत शिवाजी



विद्यापीठाच्या पदवीदान समारंभासह विविध कार्यक्रम होणार आहेत. आज, शुक्रवारी सकाळी १० वाजता त्यांचे कोल्हापूर विमानतळ येथे आगमन होईल. येथून अंबाबाई मंदिराकडे प्रयाण होईल. दर्शन झाल्यानंतर १०.५५ वाजता रंकाळा तलाव येथे काही काळ थांबून येथून शिवाजी विद्यापीठाकडे त्यांचे प्रयाण होणार आहे. दुपारी १.५० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभास ते उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर ३.४५ वाजता त्यांचे हेलिकॉप्टरने मुंबईकडे प्रयाण होणार आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 22, 2019
Powered by: erelego.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2019
लोकसत्ता

# राज्यपाल सी. विद्यासागर राव आज कोल्हापुरात

प्रतिनिधी, कोल्हापूर

**महाराष्ट्राचे राज्यपाल** सी. विद्यासागर राव हे उद्या (शुक्रवारी) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान सोहळ्याला त्यांची प्रमुख उपस्थिती आहे.

त्यांचा दौऱ्याचा कार्यक्रम- सकाळी १० वाजता महालक्ष्मी मंदिरात दर्शन, तेथून रंकाळा तलावाकडे प्रयाण. दुपारी शिवाजी विद्यापीठात दीड वाजता पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र इमारतीच्या पायाभरणी समारंभास उपस्थिती, त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान सोहळ्यास उपस्थिती. चार वाजता मुंबईकडे प्रयाण.

लोकमत

सी. विद्यासागर राव, भीमराया मेत्री यांची प्रमुख उपस्थिती : यंदा नवीन परिनियमानुसार स्वरुपात बदल

# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ आज, शुक्रवारी दुपारी दीड वाजता लोककला केंद्रात होणार आहे. अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. विद्यासागर राव, तर तिरुचिरापल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भीमराया मेत्री प्रमुख उपस्थित असणार आहेत. नवीन विद्यापीठ कायद्यातील परिनियमानुसार या वर्षापासून या समारंभाच्या स्वरुपात बदल झाला आहे. या बदलानुसार विद्यापीठातील अधिविभागांमधील पदवीधारकांनाच केवळ दीक्षान्त समारंभात पदवी प्रदान केली जाणार आहे.


या समारंभात विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या सन २०१८-१९ च्या राष्ट्रपती सुवर्णपदकाने अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील सत्यजित पाटील याला, तर कुलपती पदकाने शिरोली पुलाची (ता. करवीर) येथील साक्षी गावडे हिला सन्मानित केले जाणार आहे. विविध विद्याशाखांतील एकूण ३९ संशोधक विद्यार्थिनींना पीएच. डी. पदवी आणि विविध गुणवत्ताप्राप्त १७ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

**पहिल्याच दिवशी गर्दी**

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पुस्तकांचे व खाद्यपदार्थांचे अनेक स्टॉल मांडले होते. यात विद्यापीठातील कौशल्य विकास सेलच्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांसह विविध स्टॉल्स मांडले होते. एका स्टॉलवर विद्यापीठाचा लोगो व नाव असलेले प्रिंट केलेली टोपी, टी-शर्ट विक्रीसाठी ठेवले होते. ग्रंथ, पुस्तके पाहण्यासाठी दिवसभर गर्दी होती.



सी. विद्यासागर राव



भीमराया मेत्री

## विद्यापीठात २७०२ पदव्यांचे वितरण

या वर्षी विद्यापीठाकडून एकूण ४८,५१५ स्नातकांना पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. नव्या परिनियमानुसार विद्यापीठातील दीक्षान्त समारंभात २७०२ पदव्यांचे वितरण होणार आहे. त्यासाठी लोककला केंद्राच्या परिसरात १० स्टॉल उभारले असून, तेथे सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० या वेळेत पदवी वितरण होईल. महाविद्यालयांतील २२,१७३ स्नातकांना 'ग्रॅज्युएशन डे' कार्यक्रमात पदवी वितरण होईल. उर्वरित २३,६४० स्नातकांना पोस्टाद्वारे पदव्या पाठविण्यात येणार आहेत.

## ग्रंथदिंडी आज

या समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीचे उद्घाटन सकाळी आठ वाजता कमला कॉलेज येथे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होईल. कमला कॉलेज, जनता बझार, राजारामपुरी, माउली चौक, सायबर चौकामार्गे विद्यापीठातील लोककला केंद्रात ग्रंथदिंडीचा समारोप होणार आहे.



**ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन...!** शिवाजी विद्यापीठात ५५ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी 'नॅक'चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील व कुलगुरु देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. डावीकडून वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, ग्रंथपाल डॉ. प्रा. नमिता खोत, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. डी. राऊत.

# पदवीधारकांमध्ये विद्यार्थिनींची आघाडी

**कोल्हापूर :** विविध विद्याशाखा, अभ्यासक्रमांच्या एकूण ४८,५१५ स्नातकांना यावर्षी शिवाजी विद्यापीठाकडून पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. या पदवीधारकांमध्ये विद्यार्थिनी आघाडीवर आहेत. 'पीएच.डी.' पदवीमध्ये यंदा विज्ञान-तंत्रज्ञान विद्याशाखा अन्य शाखांच्या तुलनेत पुढे आहे.

एकूण पदवीधारकांमध्ये विद्यार्थिनींची संख्या २६,१२६ इतकी आहे. त्यांच्यापैकी १२,८७० विद्यार्थिनी या प्रत्यक्ष उपस्थित राहून, तर १३,२५६ विद्यार्थिनी पोस्टाद्वारे पदवी स्वीकारणार आहेत. व्यासपीठावर एकूण ३९ पीएच.डी. पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. त्यामध्ये १४ विद्यार्थिनींचा समावेश आहे. विविध १७ पुरस्कारांचे वितरण होणार असून, त्यामध्ये ११ विद्यार्थिनींचा समावेश आहे. यावर्षी २५८ स्नातकांना पीएच.डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. त्यामध्ये विज्ञान-तंत्रज्ञान विद्याशाखेचे विद्यार्थी अधिक आहेत. त्यापाठोपाठ मानव्यशास्त्र, वाणिज्य आणि व्यवस्थापन, आंतरविद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखा आहेत.

> गेल्या काही वर्षांपासून उच्च शिक्षणातील विद्यार्थिनींचा टक्का वाढला आहे. हा बदल केवळ संख्यात्मक नव्हे, तर गुणात्मकदेखील आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणाला बळ देणाऱ्या विविध योजना शिवाजी विद्यापीठाद्वारे राबविण्यात येत आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु

**विविध विषयांचा समावेश**

या पीएच.डी.धारकांनी विविध विषयांवर संशोधन केले आहे. त्यामध्ये ॲग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट जैवरसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, एनर्जी टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, भूगोल गणित, मेकॅनिकल इंजिनिअरिंग मायक्रोबायोलॉजी, औषधनिर्माणशास्त्र, व्यावसायिक अर्थशास्त्र, वाणिज्य, इंग्रजी, हिंदी मराठी, अर्थशास्त्र, विधि (लॉ) राज्यशास्त्र, प्राणिशास्त्र, आदी विषयांचा समावेश आहे.

## या वर्षीची आकडेवारी दृष्टिक्षेपात

- विज्ञान व तंत्रज्ञान : १२१०९
- वाणिज्य व व्यवस्थापन : ६३१३
- मानव्यशास्त्र : ७०२६
- आंतरविद्याशाखीय अभ्यास : ६७८

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 FEB 2019

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत सोहळा

## राज्यपाल सी. विद्यासागर राव, तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभानिमित्त शुक्रवार (दि. २२) दुपारी १.३० वाजता प्रमुख पाहुणे तिरुचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भिमराया मेत्री मार्गदर्शन करणार आहेत. कुलपती तथा महामहीम राज्यपाल सी. विद्यासागर राव अध्यक्षस्थानी आहेत.

यावर्षी एकूण ४८ हजार ५१५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. दरम्यान सकाळी ८ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथ दिंडीला सुरुवात होऊन विद्यापीठाच्या दीक्षांत हॉलमध्ये ग्रंथ दिंडीची सांगता होणार आहे. राष्ट्रपती सुवर्ण पदक सत्यजित संजय पाटील तर कुलपती सुवर्ण पदक साक्षी शिवाजी गावडे यांना प्रदान करण्यात येणार आहे.


शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी एकूण ४८ हजार ५१५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी २४ हजार ८७५ विद्यार्थी प्रत्यक्ष पदवी घेणार आहेत. शिवाय २३ हजार ६४० विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. तर २५८ स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. यापैकी ४० स्नातकांना व्यासपीठावर पदवी प्रदान केली जाणार आहे. प्रत्येक विषयातील प्रथम निकाल घोषित झालेल्या ४० विद्यार्थ्यांना ५७ पारितोषिके व्यासपीठावर मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभाच्या नियोजनासाठी आस्थापनामार्फत स्थापन केलेल्या १९ समित्यांची नियुक्ती केली आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत सोहळ्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर केलेली आकर्षक विद्युत रोषणाई.



सी. विद्यासागर राव



डॉ. भीमराया मेत्री

### ८० पोलीस बंदोबस्तासाठी तैनात

राज्यपाल विद्यासागर राव यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठांत दीक्षांत समारंभ होणार आहे. या पार्श्वभूमीवर बंदोबस्तासाठी ८० पोलीस उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल यांच्या प्रोटोकॉलनुसार दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम होणार आहे.

### महाविद्यालयांना दूरशिक्षण विभागातून पदवी प्रमाणपत्राचे वितरण

महाविद्यालयांनाही शुक्रवार (दि.२२) पदवी प्रमाणपत्राचे वितरण केले जाणार आहे. प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा नियुक्त प्रतिनिधींनी पत्रात दिलेल्या सुचनांनुसार पदवी प्रमाणपत्रे घेऊन जावयाचे आहे.

### आज ग्रंथदिंडी

शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून शुक्रवार २२ रोजी सकाळी ८ वाजता ग्रंथ दिंडीचे आयोजन केले आहे. कमला कॉलेजमध्ये ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार असून, जनता बझार, राजारामपुरी, शिवाजी विद्यापीठ रोड, आईचा पुतळा, सायबर चौक मार्गे विद्यापीठातील लोककला केंद्रात सांगता होणार आहे.

### विद्यापीठात ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, बंगरूळ 'नॅक'चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पुस्तके खरेदीसह खाद्य पदार्थांच्या स्टॉलवर विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनानंतर मान्यवरांनी ग्रंथ स्टॉलला भेट देऊन माहिती घेतली. शिवाजी विद्यापीठातील कौशल्य विकास सेलच्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांसह विविध स्टॉल मांडले आहेत. एका स्टॉलवर शिवाजी विद्यापीठाचा लोगो व नाव प्रिंट केलेली टोपी, टी-शर्ट विक्रीसाठी ठेवले आहे. १० ग्रंथ स्टॉल, ५ खाद्यपदार्थांचे स्टॉल, १२ कौशल्य विकास कार्यक्रमांचे स्टॉल अशा २७ स्टॉलचा समावेश आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. एस. आर. लिहितकर, डॉ. एस. बी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# ‘टेक्नॉलॉजी’ पीएचडीत अव्वल

## ७१ संशोधकांना पदवी; विभागांत मुलींची बाजी


कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातून यावर्षी पीएचडी पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सायन्स अँड टेक्नॉलॉजी हा विभाग सर्वाधिक संशोधनप्रकल्पांचा मानकरी ठरला आहे. शास्त्र व तंत्रज्ञान हे दोन्ही विषय समाजजीवनाशी व समाजातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी पोषक असल्यामुळे या अभ्यासक्रमातून संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक समस्यांना उत्तर शोधणाऱ्या संशोधनाचा आलेख यावर्षी चढता आहे. तर विद्यापीठातील अधिविभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये यावर्षी मुलींनी बाजी मारली आहे.

विद्यार्थी व शिक्षकांमधील संशोधक घडवणाऱ्या शिक्षणाची गंगोत्री असलेल्या शिवाजी विद्यापीठातून यंदा २५८ विद्यार्थी पीएचडी पदवी प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभात यापैकी ४० विद्यार्थ्यांना समारंभात पदवी प्रदान करण्यात येईल. यावर्षी सायन्स अँड टेक्नॉलॉजी या विभागातील विद्यार्थ्यांनी सर्वाधिक पीएचडी पदवी संपादन केली आहे. तर मानव्यशास्त्र विभागातील सामाजिक शास्त्र विभागातूनही पीएचडी पदवीधरांची संख्या ७० हून अधिक आहे. कॉमर्स अँड मॅनेजमेंट या विभागातील जवळपास ६० हून अधिक विद्यार्थी यंदा पीएचडी झाले आहेत तर आंतरविद्याशाखांमधील २७ विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी संपादन केली आहे.

सायन्स अँड टेक्नॉलॉजी या विषयात ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंटसह सोलर सिस्टिम या विषयात विद्यार्थ्यांनी संशोधनाला पसंती दिली आहे. बायोटेक्नॉलॉजी व पर्यावरणशास्त्रातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी घेण्यामध्ये योगदान दिले आहे. रसायनशास्त्र, कम्प्युटर ॲप्लिकेशन आणि एनर्जी टेक्नॉलॉजी या विषयातील संशोधन समाजासाठी उपयोजित असल्यामुळे या विभागातील विद्यार्थ्यांनी पीएचडीसाठी निवडलेल्या विषयांमध्ये लोकांच्या जगण्याशी निगडीत विषयांमधील संशोधनाला प्राधान्य दिले आहे. मानव्यशास्त्र विभागात भाषेतील संशोधनामध्ये अधिकांश तुलनात्मक अभ्यासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवीसाठी संशोधन केले आहे. तर सामाजिक शास्त्रामध्ये अर्थशास्त्र, विधी, राज्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र यामध्ये संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयांमध्ये सध्याच्या सामाजिक समस्यांचा वेध घेणारे संशोधन मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला आहे. ग्रंथालय व माहिती तंत्रज्ञान या विषयातही यंदा पीएचडी पदवी संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. संशोधनासाठी निवडण्यात आलेले विषय हे सध्याच्या समाजजीवनाशी धागा जोडल्याने भविष्यात या संशोधनप्रकल्पांची उपयुक्तता वाढण्याची शक्यता आहे.

### डॉ. भीमराया मेत्री यांचा अल्पपरिचय



डॉ. भीमराया मेत्री हे मूळचे सांगली जिल्ह्यातील अंकलगी या गावातील आहेत. त्यांचे पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठातून घेतले आहे. कराड येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यांनी स्थापत्यशास्त्र या विषयात पदवी संपादन केली आहे. त्यानंतर आयआयटीच्या मुंबई शाखेतून पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. सध्या ते भारतीय मानक प्राधिकरणाच्या मनुष्यबळ व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच नवी दिल्ली येथील ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशनच्या अभ्यास मंडळाचे चेअरमन आहेत. डॉ. मेत्री यांनी अमेरिकेतील ह्युस्टन येथील डिसिजन सायन्स इन्स्टिट्यूट च्या एशिया पॅसिफिक विभागाचे पहिले भारतीय उपाध्यक्षपद भूषविले आहे.



“पदवी, पदव्युत्तर स्तरावर विद्यार्थ्यांना संशोधनात रस निर्माण व्हावा यासाठी कार्यशाळा, शिबिरे, अनुदान यांचे आयोजन केले जाते. याचा चांगला परिणाम संशोधन प्रकल्प व पीएचडी पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये दिसत आहे. संशोधक अध्यापकांमुळे दर्जेदार शिक्षण हे व्रत शिवाजी विद्यापीठातर्फे जोपासले जात आहे.

डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

### आम्ही टॉपर्स

- साक्षी गावडे : सामजिक शास्त्र
- राधिका यादव : राज्यशास्त्र
- विद्या पिंपळे : समाजशास्त्र
- सूरज चौगुले : इतिहास
- दिग्विजय पाटील : अर्थशास्त्र
- अनिता पुकळे : भूगोल
- अंजली पाटील : प्राणीशास्त्र
- नाझनीन दांगर : गणित
- पूनम शिंगाडे : संख्याशास्त्र
- नीलम पाटील : केमिस्ट्री
- माधुरी पाटील : ऑरगॅनिक केमिस्ट्री
- भाग्यश्री माने : ॲग्रोकेमिकल व पेस्ट मॅनेजमेंट

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## प्रशासनाची तयारी पूर्ण; ग्रंथमहोत्सवास प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी दुपारी २ वाजता लोककला केंद्र येथे होणार असून, सोहळ्याला प्रमुख उपस्थिती इंडियन इन्स्टिट्यूट आयआयएमचे तिरुचिरापल्लीचे संचालक डॉ. भीमराया मेत्री असणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामहीम कुलपती राज्यपाल विद्यासागर राव असणार आहेत. गुरुवारी विद्यापीठ प्रशासनाकडून दीक्षांत सोहळ्याची सर्व तयारी पूर्ण झाली असून, सोहळ्यानिमित्त आयोजित ग्रंथ महोत्सवाचे उद्‌घाटनही कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

विद्यापीठाकडून गेल्या आठवड्यापासून दीक्षांत सोहळ्याची तयारी जोमात करण्यात आली होती. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने विभागनिहाय नियोजनही केले होते, तर प्रत्यक्ष सोहळ्याला उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणारे, पारितोषिक घेणारे स्नातक याबाबतचे व्यवस्थापन प्रशासनाकडून राबवण्यात आले होते. विद्यापीठाच्या ३९ अधिविभागातील २७०२ विद्यार्थ्यांसह पीएच.डी., एम.फील. आणि पारितोषिक पटकावणाऱ्या ५८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते व्यासपीठावर प्रमाणपत्र देण्याची तयारी विद्यापीठाने केली आहे.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यानिमित्त लोककला केंद्र येथे तयारी पूर्ण करण्यात आली आहे. (छाया : पांडुरंग पाटील)**

▶▶ पान २ वर

## राज्यपाल सी. विद्यासागर राव आज कोल्हापुरात



राज्यपाल सी. विद्यासागर राव शुक्रवारी जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : शुक्रवारी सकाळी १० वा. विमानतळ येथे आगमन. १०.३० वा. अंबाबाई मंदिर दर्शन, रंकाळा तलावाकडे प्रयाण, ११.२० वा. विद्यापीठाचे कुलपती यांच्या निवासस्थानी आगमन. दु. १.३० वा. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र येथे आगमन, दु. १.३० डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र इमारतीच्या पायाभरणी समारंभास उपस्थिती, दु. १.४५ वा. विद्यापीठाच्या पदवीदान सोहळ्याच्या कार्यक्रमास उपस्थिती, ३ वा. कुलपती निवासस्थानी प्रयाण, ३.३० वा. विमानतळाकडे प्रयाण.

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

**(पान १ वरून)** सोहळ्याला येणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि अन्य लोकांची संख्या लक्षात घेता गुरुवारपर्यंत विद्यापीठाकडून संपूर्ण समारंभाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. त्यामध्ये व्यासपीठावरील व्यवस्था, विद्यार्थी बैठक व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा यासारख्या सुविधा सक्षम करण्यात आल्या आहेत. लोककला केंद्राच्या आवारात भव्य मंडप तसेच एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे, तर स्नातकांना गाऊनची व्यवस्था, पदवी वाटप केंद्राची व्यवस्था यासह अन्य सोयी-सुविधांची तयारीही पूर्ण करण्यात आली आहे. दुपारी २ वाजता होणाऱ्या सोहळ्याची संपूर्ण तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

**ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन :** शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून सलग १३ व्या वर्षी 'ग्रंथमहोत्सव २०१९'चे उद्‌घाटन गुरुवारी लोककला केंद्र / दीक्षांत सभामंडपजवळ उभारण्यात आलेल्या स्टॉलमध्ये करण्यात आले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पूजन व दीप्रज्वलन करून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अरुण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच बुक स्टॉल्सचे उद्‌घाटन जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, व्ही. डी. नांदवडेकर, कुलसचिव, व्ही. टी. पाटील, वित्त व लेखा अधिकारी, आर. के. कामत, संचालक, आय. क्यू. ए. सी., डॉ. पी. डी. राऊत, अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास केंद्र व गुरव ए. एम. कॉमर्स विभागप्रमुख, नमिता खोत, संचालक, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, डी. बी. सुतार, उपग्रंथपाल, एस. व्ही. थोरात, सहायक ग्रंथपाल, एस. आर. लिहितकर, एस. बी. पाटील उपस्थित होते. या ग्रंथमहोत्सवामध्ये १० पेक्षा अधिक पुस्तकांचे, ५ खाद्यपदार्थांचे व १२ कौशल्य विकास कार्यक्रमांचे असे एकूण ३१ स्टॉल सहभागी झाले असून, हे स्टॉल दि. २१ ते २२ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सर्वांसाठी उपलब्ध आहेत.




कोल्हापूर : ग्रंथमहोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू देवानंद शिंदे व आदी मान्यवर.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अरुण पाटील, डॉ. जगन्नाथ पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू आत्तार)

# ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून १३ व्या वर्षी 'ग्रंथ महोत्सव २०१९' चे उद्घाटन गुरुवारी (दि.२१) सकाळी लोककला केंद्र, दीक्षान्त सभा मंडपजवळ उभारण्यात आलेल्या स्टॉलमध्ये झाले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व डॉ. अरुण पाटील यांच्या हस्ते बॅ. बाळासाहेब खर्डेकर व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन झाले. 'नॅक'चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते बुक स्टॉल्सचे उद्घाटन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, आय. क्यू. ए. डॉ. संचालक आर. के. कामत, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. एस. व्ही. थोरात आदी उपस्थित होते.

ग्रंथ महोत्सवात दहापेक्षा अधिक पुस्तके, पाच खाद्यपदार्थ व १२ कौशल्य विकास कार्यक्रमांचे स्टॉल आहेत. यात मराठी, विज्ञान, अध्यात्म, स्पर्धा परीक्षा विषयांच्या पुस्तकांच्या स्टॉलचा समावेश आहे. ग्रंथ महोत्सवातील स्टॉल २१ ते २२ फेब्रुवारीदरम्यान सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सुरू राहतील. विद्यार्थी, वाचक, ग्रंथप्रेमी यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त सोहळा

## राज्यपाल विद्यासागरराव, डॉ. मेत्री यांची उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ आज (ता. २२) येथील लोककला केंद्रामध्ये होणार आहे.

राज्यपाल व कुलपती सी. विद्यासागरराव आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेनॅजमेंटचे (आय. आय. एम.) संचालक डॉ. भीमराया मेत्री यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पदवी प्रदान कार्यक्रम होईल. उद्या होणाऱ्या दीक्षान्त सोहळ्याची अंतिम तयारी झाली असून, यानिमित्त विद्यापीठात ग्रंथप्रदर्शन भरवले आहे.

लोककला केंद्रामध्ये आसन व्यवस्था केली. लोककला केंद्राकडे जाणाऱ्या मार्गावर मंडप उभारला आहे. विद्यापीठाच्या इमारतीला आकर्षक रोषणाई केली आहे. आज सकाळी १० वाजता ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. नमिता खोत, डॉ. पी. डी. राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रंथप्रदर्शनात साहित्य, विज्ञान,

पान ९ वर »

सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दीक्षान्त सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असून गुरुवारी सभागृहातील आसन व्यवस्था करताना कर्मचारी.**

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त सोहळा

**» पान १ वरून**

तंत्रज्ञान, क्रीडा, व्यवसाय व्यवस्थापन याबाबतची विविध पुस्तके उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी उभारलेल्या खाद्य स्टॉलवरही गर्दी दिसून येत होती. सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील सुरक्षाव्यवस्था कडक केली आहे. सुवर्णपदक मिळालेल्या सत्यजित पाटील आणि कुलपती पदक मिळवलेल्या साक्षी गावडे यांच्यासह ५५ जणांना सोहळ्यात पदवीने गौरव होणार असून, सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयात पदवी प्रदान करण्यात येईल. दुपारी २ वाजता पदवीप्रदान सोहळा होईल. सोहळ्याआधी राज्यपाल विद्यापीठातील काही अध्यासने विभाग यांना भेटी देणार आहेत. या वेळी कुलगुरूंसह सर्व विभागांचे प्रमुख, सिनेट सदस्य, प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहतील.

## राज्यपालांचा दौरा असा

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे सकाळी १० वाजता विमानतळावर आगमन होणार आहे. त्यानंतर ते १०.१५ वाजता करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात येऊन देवीचे दर्शन घेतील. तेथून ते रंकाळा तलावावर जाणार आहेत. रंकाळ्याची पाहणी करून तेथून ११.३० वाजता विद्यापीठातील कुलपती निवासस्थानी जाणार आहेत. त्यानंतर ते विद्यापीठातील विविध उपक्रमांची माहिती घेतील. येथील काही विभागांना ते भेटी देणार आहेत. या वेळी राज्यपालांच्या हस्ते एका इमारतीचे भूमिपूजन करण्यात येईल. दुपारी २ वाजता पदवीप्रदान सोहळा होणार आहे. दुपारी ३.३० वाजता मुंबईकडे जाण्यासाठी ते विमानतळाकडे जातील.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्राची आज पायाभरणी

## राज्यपाल, पालकमंत्र्यांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दै. 'पुढारी'चे संस्थापक-संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या नावाने शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता अध्यासन केंद्र इमारतीचा पायाभरणी समारंभ शुक्रवारी (दि.२२) दुपारी १.३० वाजता राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते व पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

यावेळी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे अध्यक्ष व 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी होत आहे. या भेटीचे औचित्य साधून डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन पायाभरणी समारंभ होत आहे. पत्रकारिता विभागात सुरू होणारे हे देशातील पहिले अध्यासन आहे. विद्यापीठात २०१७ ला अध्यासनाची सुरुवात झाली. अध्यासनामार्फत २०१८ पासून पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम कोर्ससह ऑनलाईन अँड डिजिटल जर्नालिझम, रिपोर्टिंग अँड एडिटिंग, मोबाईल जर्नालिझम आदी विषय शिकवले जातात.

पुढारी

# महाविद्यालयांचा 'दीक्षान्त समारंभ' एक महिन्याच्या आत

## पदवी वितरण समारंभाची नियमावली जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमामधील २०१८ चा एकरुप नवीन परिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ झाल्यानंतर एक महिन्याच्या आत संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांना पदवी वितरण समारंभ घ्यावा लागणार आहे.

महाविद्यालयांमध्ये यावर्षीपासून पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाने पदवी वितरण समारंभाची नियमावली विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिली आहे. पदवी प्रदान समारंभासाठी प्राचार्य व संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. समारंभस्थळी मंचाच्या पाठीमागील पडद्यावर शिवाजी विद्यापीठ इमारत व बोधचिन्ह प्रतिमा व त्यानंतर महाविद्यालयाचे नाव व बोधचिन्ह असावे लागणार आहे.

**शिवाजी विद्यापीठातून...**

पदवी वितरण समारंभासाठी महाविद्यालयांना विद्यापीठाकडून दहा हजार रुपये देण्यात येतील. समारंभाचा अहवाल विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर ही रक्कम महाविद्यालयांना देण्यात येईल. एकच संस्थेची एकाच शहरात अनेक महाविद्यालये असल्यास त्यांच्याकरिता पदवी वितरण समारंभ एकत्रित आयोजित करता येणार आहे.

समारंभ मिरवणुकीत विद्यापीठाचा ध्वज परीक्षा प्रमुखांकडे असेल. शासनाच्या पद्म पुरस्काराने सन्मानित अथवा शैक्षणिक, संशोधन, सामाजिक, संरक्षण, उद्योग, कृषी, कला, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करावे. समारंभाच्या पोशाखाबाबत संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांना अधिकार देण्यात आले आहेत.

व्यासपीठावरील बैठक व्यवस्थाही ठरविण्यात आली आहे. व्यासपीठावर विद्यापीठाच्या अधिकार मंडळातील एक सदस्य निमंत्रित असेल. समारंभाचा अहवाल विद्यापीठास सादर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. पदवी प्रमाणपत्र समारंभात इतर कोणत्याही बाबींचा अंतर्भाव करू नये असे, महाविद्यालयांना पाठविण्यात आलेल्या नियमावलीत म्हटले आहे.

सकाळ

# प्रियांका पाटील यांना पारितोषिक



**कोल्हापूर :** एम. ए. इतिहास विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे दरवर्षी रामराव अनंतराव ऊर्फ भाऊसाहेब भोसले स्मृती पारितोषिक दिले जाते. ते यंदा शिरोली पुलाची येथील प्रियांका पाटील यांना जाहीर झाले आहे. शुक्रवारी (ता. २२) होणाऱ्या ५५ व्या दीक्षांत समारंभादरम्यान पारितोषिक प्रदान केले जाईल. गेल्या वर्षी त्यांना विद्यापीठातर्फे राष्ट्रपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले होते. यापूर्वी त्यांना इतिहास विषयातील कॅप्टन वसंतकुमार चव्हाण शिष्यवृत्तीही मिळाली आहे. इतर उपक्रमांतील सहभागाबरोबर गुणवत्ता यादीत यश मिळविण्यात सातत्य राखल्याचा आनंद मोठा असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Main
22/02/2019 Page No. 2

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2019
तरुण भारत

# प्रियांका पाटील यांना भाऊसाहेब भोसले स्मृती पारितोषिक जाहीर

**कोल्हापूर :** एम. ए. इतिहास विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे दरवर्षी रामराव अनंतराव ऊर्फ भाऊसाहेब भोसले स्मृती पारितोषिक दिले जाते. ते यंदा पुलाची शिरोली येथील प्रियांका पाटील यांना जाहीर झाले आहे. शुक्रवार २२ रोजी होणाऱ्या ५५ व्या दीक्षांत समारंभादरम्यान पारितोषिक प्रदान केले जाईल.



गेल्या वर्षी त्यांना विद्यापीठातर्फे राष्ट्रपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले होते. यापूर्वी त्यांना इतिहास विषयातील कॅप्टन वसंतकुमार चव्हाण शिष्यवृत्तीही मिळाली आहे. इतर उपक्रमातील सहभागाबरोबर गुणवत्ता यादीत यश मिळविण्यात सातत्य राखल्याचा आनंद मोठा असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. त्यांना इतिहास अधिविभागप्रमुख डॉ.नंदा पारेकर, डॉ.अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (ता. २२) होत असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट आयआयएम, तिरुचिरापल्लीचे संचालक डॉ. भीमराया मेत्री उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव भूषविणार आहेत. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दुपारी दोन वाजता हा समारंभ होईल.

दीक्षान्त सोहळ्यात सर्वसाधारण गुणवत्तेसाठी देण्यात येणारे राष्ट्रपती सुवर्णपदक पदार्थविज्ञान विभागातील सत्यजित संजय पाटील याला तर कुलपतीपदक महावीर महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी शिवाजी गावडे हिला प्रदान करण्यात येणार आहे.

यंदा एकूण ४८५१५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठातील ३९ अधिविभागातील २७०२ विद्यार्थ्यांसह पीएच.डी., एम. फील., पदवीधर व अधिविभागांतर्गत पारितोषिक प्रदान



**४८५१५ स्नातकांना पदवी मिळणार प्रमाणपत्रे**

अशा एकूण ५८ विद्यार्थ्यांना डॉ. मेत्री यांच्या हस्ते पदवीप्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. पीएच. डी. पदवी प्राप्त केलेल्या स्नातकांची एकूण संख्या २५८ असून त्यापैकी ४० स्नातकांना व्यासपीठावर पदवीप्रदान करण्यात येणार आहे. अधिविभागांतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पदवी देण्यात येणार आहे. दरम्यान, दीक्षान्त कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सकाळी ८ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे.

पुढारी


# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## राज्यपाल सी. विद्यासागर राव, डॉ. भीमराया मेत्री यांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (दि.२२) विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दुपारी दोन वाजता होणार आहे. भारतीय प्रबंध संस्थान (आय.आय.एम.) तिरुचिरापल्लीचे संचालक डॉ. भीमराया मेत्री हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

सर्वसाधारण गुणवत्तेसाठीचे राष्ट्रपतींचे पदक विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील सत्यजित पाटील व कुलपतींचे पदक महावीर महाविद्यालयातील साक्षी गावडे हिला मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

दीक्षान्त समारंभात ४८५१५ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येणार आहे. पीएच.डी., राष्ट्रपती व कुलपती पदक व अधिविभागातील पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पदवी प्रदान करण्यात येणार आहेत.

दूरशिक्षण केंद्रात दि.२२ रोजी सकाळी ८ ते १ या वेळेत महाविद्यालयांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण केले जाणार आहे. दीक्षान्त समारंभानिमित्त शुक्रवारी (दि.२२) रोजी सकाळी ८ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. दीक्षान्त समारंभात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अहवालाचे वाचन करणार आहेत.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# दीक्षान्त सोहळा आज



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त गुरुवारी ग्रंथमहोत्सवास प्रारंभ झाला. या महोत्सवात पुस्तके पाहताना विद्यार्थिनी.



## 'फूड टेक्नॉलॉजी'चे लक्षवेधी स्टॉल

शिवाजी विद्यापीठातील फूड टेक्नॉलॉजी, कॉमर्स व मॅनेजमेंट, एमबीए या विभागांसह कौशल्य व उद्योजकता विकास या विभागातील विद्यार्थ्यांनी मांडलेल्या स्टॉल्सवर हेल्दी फूडचा आस्वाद घेण्यासाठी गर्दी होत आहे. यामध्ये खाऊच्या पानापासून बनवण्यात आलेले पेय, पौष्टिक चॉकलेट, एनर्जी ड्रिंक विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील प्रोजेक्ट म्हणून केले आहेत. या पदार्थांचे स्टॉल्स लक्ष वेधून घेत आहेत. तर स्कील अँड डेव्हलपमेंट विभागातर्फे विद्यापीठाचा लोगो असलेले टी शर्ट, कॉफी मग, फोटो फ्रेम, कॅप तयार करण्यात आले आहेत.

कोल्हापूर टाइम्स टीम

शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या अवलियांचे प्रेरक जीवनपट, करिअरच्या संधीचे सोने करणारी दिशा, आदर्शवत व्यक्तींची चरित्रे, तंत्रज्ञान, भाषा, प्रवासवर्णनापासून अनुभवकथन आणि अनुवादित साहित्य अशा विविध विषयांवर आधारित पुस्तकांच्या दुनियेत विद्यापीठातील तरुणाई गुरुवारी हरवून गेली.

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवार (ता. २२) होणार आहे. यानिमित्त विद्यापीठात ग्रंथमहोत्सवाचे आयोजन केले आहे. कमला कॉलेजपासून आज ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. लोककला मंडपासमोर आयोजित ग्रंथमहोत्सवात ३१ स्टॉलची मांडणी करण्यात आली आहे. २१ ते २२ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

## ग्रंथमहोत्सवाला प्रारंभ; शहरातून आज ग्रंथदिंडी

गुरुवारी सकाळी दहा वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करुन राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद नॅकचे प्रमुख सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व डॉ. अरुण पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाअधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, संचालक, आय. क्यू. ए. सी.डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. एस. आर. लिहितकर, डॉ. एस. बी. पाटील, उपस्थित होते. या ग्रंथमहोत्सवामध्ये १० पेक्षा अधिक पुस्तकांचे, पाच खाद्यपदार्थांचे व १२ कौशल्य विकास विभागाचे एकूण ३१ स्टॉल आहेत.

शिवाजी विद्यापीठातंर्गत ३९ अधिविभागातील २७०२ विद्यार्थ्यांसह पीएचडी, एम. फील आणि अधिविभागातील पारितोषिक पटकावणाऱ्या ५८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते व्यासपीठावर प्रमाणपत्र देण्याची तयारी विद्यापीठाने केली आहे. बैठक व्यवस्थेसह स्क्रीन लावण्यात आले आहे. त्यामध्ये व्यासपीठावरील व्यवस्था, विद्यार्थी बैठक व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा यासारख्या सुविधा करण्यात आल्या आहेत. प्रवेशद्वारांबाहेर पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. लोककला केंद्राच्या आवारात भव्य मांडव तसेच एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2019
Times of India

# Granth Mahotsav begins at SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The 13th edition of Granth Mahotsav began on the Shivaji University, Kolhapur (SUK) campus on Thursday. The three-day event has around 30 stalls from which the visitors can not only buy books but can also taste local delicacies.

The event was inaugurated in the presence of SUK vice-chancellor Devanand Shinde, advisor of NAAC Jagannath Patil, among other dignitaries. The event has been organised in view of the 55th convocation ceremony on the campus for which over 10,000 visitors, including students, are likely to remain present.

Last year, the event had hosted over 50 book stalls and most of the publishers had offered a discount of 20-30%. A SUK official said that they are hoping for a better response for the 'Teachers' Personal Library Scheme' (TPLS) during the said event.

"The TPLS scheme offers 50% discount to teaching as well as non-teaching faculties on purchase of books. Under the scheme along with teachers, class one, two and three officers of the university and affiliated colleges are allowed 50% grant on the buying books," the official said.

